Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3, Issue-4, Oct-2013 Available online at www.lbp.world

# ग्रामिण विकास

**प्रा. वसंत व्हि. आरू**

**सहा. प्राध्यापक , वाणिज्य विभाग ,**
**श्री रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव ता.मालेगांव जि. वाशिम.**

**सारांश :-** भारत हा कृषी प्रधान देश आहे.भारतातील ७०% जनता ही ग्रामीण भागात वास्तव्य करते. तसेच जवळ प्राप्त ७४% लोक कृषीवर अवलंबुन आहेत.भारतीय अर्थव्यवस्था हि कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहेत.म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे खुप महत्व आहे.भारतीय राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा १४% इतका आहे.विकसित देशात मात्र शेती क्षेत्राचा वाटा हा.२% ते ५% ऐवढा आहे.

**प्रस्तावना-**

पूर्वी भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा हा ५५% ते ५६% इतका होता.तो त्यांना १४% पर्यन्त घटत आहे. परंतु इतर विकसित देशाचा प्रमाणात तो जास्त आहे. त्यामुळे भारतीय अर्थ् व्यवस्थेच्या दृष्टीने भारतातील शेती व्यवसायावर इतर उद्योग व व्यवसाय अवलंबून आहे. म्हणून आपण ग्रामीण भागाच्या विकास घडवून आणण्यासाठी प्रर्यन्त करणे गरजेचे आहे. ग्रामीन भागाचा विकास साधता आला तर आपल्याला संपूर्ण देशाच्या विकास साधता येईल.

**कृषी विकास** :- भारतातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीच्या विकास होणे आवश्यक आहे. शेतीच्या विकास झाला तरच भारताचा विकास होईल म्हणून भारतीय अर्थ व्यवस्थेच्या कणा समजून शेतकडे लक्ष दयावे लागेल.

भारतीय शेती ही मुख्य निसर्गावर अवलंबून आहे. ६५% शेती ही निसर्गावर आवलंबून आहे. ३५ %ओलीत आहे. अत्यंत अल्प प्रमाणात ती सिचंनाखाली आली आहे. भारतीय शेती ही जास्तीत जास्त सिचंनाखाली कशी येईल याकडे प्रथम लक्ष दयावे लागले त्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविल्या गेली पाहिजे . म्हणजे त्या ठिकाणी पाणी साठवीता येईल त्या त्या ठिकाणी पाणी साठवावे लागेल. छोटे बंधारे पासून तर मोठया धरणा पर्यंत.पाण्याचे साठे तयार करावे लागतील जेने करून निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून न राहता साठविलेल्या पाणाचा उपयोग करता येईल. पाण्या बरोबरच शेतीसाठी अत्यंत महत्वाची बाब म्हणजे पाणी आणि विज या दोही घटक मिळाल्या शिवाय शेतीचा विकास होत नाही. सिंचनाचे क्षेत्र ज्या प्रमाणात वाढविता येईल वाढविने गरजेचे आहे.

**मार्गदर्शन :-** सिंचन क्षेत्र वाढेल म्हणजेच शेतीचा विकास घडून येईल असे म्हणता येणार नाही. तर शेतकऱ्यांना वारंवार मार्गदर्शन देखील करावे लागेल दर्जदार बियाणे खते, उपलब्ध करून दयावे लागतील तसेच पाण्याचा योग्य वापर, औषध फवारणीचे तंत्रज्ञान हवमानाचा अंदाज , इत्यादी बाबत वारंवार मार्गदर्शन केल्यास शेती व्यवसाय हा लाभदायक करून विकासाला हातभार हातभार लावण्यास मदत होत.

**शेतीला पुरक व्यवसाय :-** भरतातील लहरी हवमान असल्या कारणामुळे भारतीय शेती व्यवसायावर अनेक प्रकारची नैसर्गीक संकटे येऊ शकतात . नैसर्गीक संकटामुळे शेती व्यवसाय तोटयात जाण्याची दाट शक्यता असते. म्हणून शेती पुरक व्यवसाय निर्माण करणे अत्यंत गटरजेचे आहे.

सिंचन वाढविण्यासाठी शेततळे अत्यंत महत्वाचे साधन आहे. पडीत किंवा नापिक जमीनीमध्ये शेततळे घेतल्याचस सिंचनाची सोय तर होतेच परंतु त्याच बरोबर मच्छी पालन हा व्यवाय देखील करता येतो तसेच मोती व्यवसाय देखल करता येथे. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हयात सध्या हया व्यवसायला सुरवात झाली आहे. पशुपालन हा देखील शेतीशी निगडीत व्यवसाय आहे. गाई म्हशी , हयापासून भरपूर प्रमाणात दुध उत्पादन घेता येतो. त्यासाठी गायी म्हशीच्या कोणत्या जाती कोणत्या भागात पाळाव्यात हया संबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल्यामुहे दुधाचे मोठयाप्रमाणात उत्पादन घेवून शेतीची उत्पदकता वाढविता येईल.

शेतीशी अत्यंत महत्वाचा पूरक व्यवसाय म्हणजेच शेळी पालन होय. भारतात अनेक प्रकारच्या शेळीच्या जाती आहेत. प्रादेशिक हवा मानानुसार शेळी पालन करण्यास मार्गदर्शन केल्यास दुध, सेंद्रीय खत आणि मास याचे मोठया प्रमाणात उत्पादन घेऊन ग्रामीन विकास साधता येईल.

**ग्रामीण विभागासाठी पत धोरण :-**

शेती व शेतीशी संबंधी व्यवसायात गुंतवणूक करण्याची सहकारी बँक, व्यवसायतील बँक, शासकीय अनुदान इत्यादी मार्फत मदत केली जाते. वित्त पुरवठा करण्याच्या संस्थाकडून अल्प व दिर्घ मुदतीची कर्ज दिली जातात. भारतातील बहूतांश शेतकरी हे गरीब अहेत. शेती व शेतीशी पुरक व्यवसाय करण्यासाठी त्यांचेकडे भांडवल उपलब्ध नाही.वित्त पुरवठा करणाऱ्या संख्या व शासन यांनी योग्य नियोजन करून शेतीला व शेतीशी निगडित असणाऱ्या मंजुरदाराना अल्प दरात कर्ज पुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे घटनेचे आहे.शासनाने अनेक प्रकारच्या योजना हया२५%,३५%, ५०% व १००% अनुदानावर देण्याचे धोरण आखल आहे.परंतु हया योजना प्रत्यक्षात सर्व शेतकऱ्या पर्यंत प्रत्यक्षात जात नाहीत.प्रत्येक शेतकरऱ्यांना हया योजनेचा लाभ घेता यावा.हयासाठी योग्य प्रकारचे नियोजन केल्या गेले पाहिजे दरवर्षी आर्थिक नियोजन शेती व शेती पुरक व्यवसायासाठी भरपुर निधि निर्माण राखुन ठेवल्या गेला पाहिजे.बचत गट निर्माण करून शेतीशी राज्यात लघू उद्योग निर्माण करण्यास प्रोत्साहन दिल्यास शेतकऱ्यांना कच्या मालाघालून पक्का माल तयार करता येईल व त्याला येग्य भाव प्राप्त होईल.

**शेतमाला भावा :-** शेतीचे उत्पन्न वाढले म्हणजे ग्रामीन भागातील लोकाचे उत्पादन वाढले तसे समजने चुक होईल शेतकऱ्यांच्या शेतमालाला इतर उत्पादकाप्रमाणे उत्पादन खर्च + नफ = विक्री किमंत हया प्रमाणे शेत मालाला भाव मिळाला तरच ग्रामीण विकास साधल्या जाऊ शकतो. शासनाने प्रत्येक धान्याचे भाव उत्पादन खर्च लक्षात घेवून निश्चित करावेत व त्या शेतकऱ्याच्या मालाला हमी भाव निश्चित करून दयावेत की केले करून शेती व्यावसाय तोटयात जाणार नाही. शेतीच्या उत्पादकता प्रक्रिया भरणारे उद्योग तसेच रोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन इत्यादी स्त्रोत उपलब्ध करून दिल्यास.

**पिक विमा योजना :-**

निसर्गाच्या लहरी पणा व नैसर्गीक आपत्तीमुळे पिक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया, प्रमाणात नुकसान होते. शेतकरी हया संकटात सापडतो. व आत्महत्ेचा मार्ग स्विकारतो. नैसर्गिक आपत्तीपासुन मोठया प्रमाणात नुकसान होऊ नये हया साठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अचूक हमानाचा अंदाज प्रत्येक शेतकऱ्या पर्यंत प्रसारीत करण्यासाठी योग्य प्रकारे नियोजन केले तर शेत मालाचा नुकसान फारसे होणार नाही.

इतर क्षेत्रात विम्याचा प्रकार मोठया प्रमाणात झाला स्विकारलेल्या जोखीम पासून नुकसान
झाल्यास विमा कपंन्या संरक्षण देतात.

शासनाने देखील पिक विमा योजना आमलात आणली आहे. परंतु त्या मध्ये सर्व पिकाचा समावेश केल्या गेला नाही. शेतकऱ्यांच्या सर्व पिकाचा पिक विमा योजनेत समावेश व्हावा हयासाठी आवश्यक उपाय योजना कराव्यात व शेतकऱ्याच्या पिकाला योग्य संरक्षण देण्यात यावे. शेती पुरक व्यवसायात येणाऱ्या पशुधनाला देखील विम्याचे कवच प्राप्त व्हावे. पुशधनामध्ये केलेल्या गुंतवणूकी देखील संरक्षण मिळेल.

सिंचनाची सोय, नियमित विज पुरवठा, मातीचे परिक्षण, दर्जेदार बियाणे, खते व किटके नाशके व शेती पुरक असणाऱ्या व्यसायाला प्रोत्साहन शेतीच्या उत्पादनावर प्रक्रिया करणरे उद्योग तसेच रोजगार करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन इत्यादी साठी उपलब्ध करून दिल्यास निश्चित ग्रामिन विकास साध्य होवु शकेल.

**निष्कर्ष :-**

१) ग्रामीण विकासाकरीता शासकीय स्तरावर अनेक योजना आहेत. परंतु त्या सर्व स्थरापर्यंत पोहचत नाहीत.
२) नेते व पुढारी यानांच हया योजनाचा लाभ मिळतो गरीब व गरजूना लाभ मिळत नाही.
३) शेती पुरक व्यवसायाला बँकेकडून सहजा सहजी कर्ज मिळत नाही.
४) शासनाच्या अनुदान योजनेच्या कामात भष्ट्राचार आढळून येता.
५) शेतीशी संबंधीत काही योजना फक्त कागदावर दिसतात प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी होत नाही.
६) बँका व वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थास कर्मचास लाच खाण्याची प्रवृत्ती.

**शिफारशी :-**

१) शासकीय योजनांचा व कर्ज पुरवठा करणाऱ्या सर्व संस्थाचा गरजूवंताना लाभ मिळाला पाहिजे.
२) भष्ट्राचाराला व वशिले बाजीला आळा घालने गरजेच आहे.

३) पिक विमा योजने नुसार नुकसान होणाऱ्या सर्व घटकांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे.
४) प्रत्येक आर्थिक वर्षात सादर होणाऱ्या अदांज पत्रकात कृषी विषयक विकासाठी मोठया प्रमाणात तरतुद केल्या गेली, पाहिजे तसेच तरतुद केलेला निधी विकास कामासाठी खर्च झाल्यास कृषीचा विकास होईल पर्यायाने ग्रामीन विकास देखील साध्य होईल.

**संदर्भ सुची :-**

१) भारतीय अर्थ व्यवस्था विकास - डॉ.पी.एन. झामरे.
२) सकाळ अग्रोवन
३) भारतीय अर्थशास्त्र प्रा. ग.ना. झामरे प्रा.सु.पा.देव
४) योजना जाने. २०१०
५) योजना माने २०११
६) इंटर नेट
७) जिल्हा परिषद व पंचायत समिती वाशिम मधील विविध योजना चे माहिती पत्रक.